INTERNATIONAL RESEARCH

# RESEARCH JOURNEY

UGC Approved Multidiciplinary International Research

PEER REFREED & INDEXED JOURNAL

Vol. (II)

12 January 2019 Special Issue – 92

* Dr. Kailas Saw (History) (7)

# भारतीय इतिहासातील स्त्रीयांचे योगदान



राष्ट्रमाता जिजाऊ माँ साहेब

(1) Dr. Kailas Sawant (History)

**Chief Editor**
Dr. Dhanraj T. Dhangar
Assist. Prof. (Marathi)
MGV'S Arts & Commerce college,
Yeola, Dist. Nashik (M.s.) India

**Prof. Gangane R.V.**
Assit. Prof. Dept. of History,
Vasant Mahavidalaya , Kaij, Dist. Beed

**Dr. M.S. Kamble**
Assit. Prof. Dept. of History,
Vasant Mahavidalaya , Kaij, Dist. Beed

SWATIDHAN PUBLICATION
Visit to - www.researchjourney.net

RESEARCHJOURNEY

Impact Factor – 6.261 ISSN – 2348-7143
INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

Multidisciplinary International E-research Journal
PEER REFREED & INDEXED JOURNAL
**Vol II**

**12 January 2019**
**SPECIAL ISSUE – 92**

# भारतीय इतिहासातील स्त्रीयांचे योगदान

**Chief Editor -**
**Dr. Dhanraj T. Dhangar,**
Assist. Prof. (Marathi)
MGV'S Arts & Commerce College,
Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA

**Prof. Gangane R.V.**
Assit. Prof. Dept. of History,
Vasant Mahavidalaya , Kaij, Dist. Beed

**Dr. M.S. Kamble**
Assit. Prof. Dept. of History,
Vasant Mahavidalaya , Kaij, Dist. Beed

SWATIDHAN INTERNATIONAL PUBLICATIONS
For Details Visit To : www.researchjourney.net
© All rights reserved with the authors & publisher
Price : Rs. 400/-

RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E-Research Journal | ISSN- 2348-7143
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452, (GIF) –0.676
Special Issue 92 , भारतीय इतिहासातील स्त्रियांचे योगदान | 12 January 2019 | UGC Approved No. 40705

# Index

1. आई जिजाऊ माँ साहेब — प्रा.डॉ.कंधारे विश्वास — 7
2. मराठवाड्यातील कामगार चळवळतील कॉ. करुणा चौधरी यांचे कार्य — प्रा. डॉ. संतोष पहारे — 9
3. वैदिकसंस्कृतीकालीनस्त्रीयांचा दर्जा व विवाह संस्था — प्रा.डॉ.सुरेश कातळे — 11
4. भारतीय क्रांतीकारी चळवळीतील स्त्रियांची भूमिका — प्रा.केशव अंबादास लहाने — 13
5. 1857 च्या उठावातील राणी लक्ष्मीबाईचे योगदान — प्रा. डॉ. घोलप कमलाकर गोरख — 16
6. महर्षि विठ्ठल रामजी शिंदे यांच्या विचारातील स्त्री-पुरुष समानता — डॉ.मनिषा बंडुराव रोकडे — 19
7. मराठ्यांच्या इतिहासातील आद्य कर्तृत्वान स्त्री- उमाबाई भोसले — प्रा.डॉ. सावंत के.डी. — 20
8. मराठ्यांच्या इतिहासातील यशुबाईचे कार्य — प्रा. चव्हाण आर.ए. — 22
9. हैद्राबाद मुक्ती संग्रामातील महिलांचे योगदान — प्रा. मिलिंद व्यंकटी घाडगे — 24
10. 19 व्या शतकाच्या स्त्री शिक्षणातील पंडिता रमाबाई यांची भूमिका व कार्य — प्रा. वटाणे कल्याण राजेंद्र — 26
11. मध्ययुगीन कालीन एक प्रभावी महिलाः रझिया सुलताना — डॉ. शेख हुसैन इमाम — 28
12. भारतीय स्त्री सुधारणा चळवळ — प्रा.प्रमोद चव्हाण — 30
13. आधुनिक महाराष्ट्राच्या राजकारणात महिलांचा सहभाग व भूमिका — डॉ. प्रशांत अ. साबळे — 32
14. सत्यशोधक चळवळ आणि स्त्रियांचे कार्य एक अवलोकन — प्रा. डॉ. रामभाऊ मुटकुळे — 35
15. सावित्राबाई फुले यांचे शैक्षणिक कार्य व विचार एक अभ्यास — डॉ.पठाण झेड. ऐ. — 37
16. जानकीबाई आपटे यांचे भारतीय स्वातंत्र्य आंदोलनातील योगदान — प्रा. डॉ.गट्टी जी.व्ही., डॉ.नाईक एन.डी. — 40
17. 19 व्या शतकांतील स्त्रीवादी पत्रकारितेचा शोध — डॉ.कुलकर्णी भालचंद्र गोंविदराव — 42
18. स्त्री सबलीकरणा संदर्भात ताराबाई शिंदे चे योगदान — डॉ. राजेश करपे , प्रा. शेडगे के. डी. — 45
19. भारतीय स्वातंत्र्यलढा आणि भारतीय स्त्रीयांची भूमिका — प्रा.डॉ.लक्ष्मीकांत जिरेवाड — 47
20. मराठेशाहीच्या इतिहासातील महान व्यक्तिमत्व : राष्ट्रमाता जिजाबाई — सहा. प्रा. कलाणे कांतराव किसनराव — 49
21. शिवकालीन स्त्रियांचे कार्य : महाराणी जिजाबाई — श्रीमती सरवदे वर्षा तात्यासाहेब — 52
22. महाराणी येसुबाई — प्रा. पावडे खोब्राजी वामनराव — 54
23. स्वराज्यहिताला सर्वोच्च प्राधान्य देणाऱ्या महाराणी येसूबाई — प्रा. रणदिवे डी. एम. — 57
24. सत्यस्वरुप सगुणाबाई क्षीरसागर यांचे सत्यशोधक चळवळीतील योगदान - एक अभ्यास — सुरेखा जावळे — 59
25. संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनात महिलांचे कार्य - एक आढावा — प्रा. डॉ. शारदा कदम — 61
26. हैद्राबाद मुक्ती संग्रामातील स्त्रीयाचे कार्य — प्रा. शिंदे हरिदास अर्जुन — 63
27. सत्यशोधक चळवळ आणि स्त्री सुधारणा - एक आढावा — प्राचार्य डॉ. बबन पवार — 65

RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E-Research Journal | ISSN- 2348-7143
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452, (GIF) –0.676 | 12 January 2019 | UGC Approved
Special Issue 92 , भारतीय इतिहासातील स्त्रियांचे योगदान | | No. 40705

# मराठ्यांच्या इतिहासातील आद्य कर्तृत्वान स्त्री- उमाबाई भोसले

प्रा.डॉ. सावंत के.डी.
इतिहास विभाग प्रमुख, महिला महाविद्यालय गेवराई

---

**प्रस्तावना :**

कार्लाईल या विचारवंताने म्हटले आहे, "थोर व्यक्तींची चरित्रे व त्यांनी बजावलेली कामगिरी म्हणजे इतिहास होय."[1] ही व्याख्या मर्यादित स्वरुपाची असली तरी ती पूर्णपणे अर्थहीन अथवा चुकीची आहे असे म्हणता येत ना ही. कार्लाईलला असे म्हणावयाचे होते की, काही श्रेष्ठ व्यक्ती आपल्या कर्तृत्वाच्या विचारांच्या सामर्थ्यावर संपूर्ण राष्ट्रांची, समाजाची दिशा बदलतात. एखाद्या थोर व्यक्तीचे चरित्र हे त्या देशाचा त्या काळातील इतिहास असतो. एखाद्या व्यक्तीची त्या काळातील घडामोडींवर एवढी छाप पडलेली असते की, त्या व्यक्तीचे चरित्र म्हणजेच त्या काळातील इतिहास असतो. वस्तुतः प्रत्येक ऐतिहासिक व्यक्ती तत्कालीन विशिष्ट सामाजिक, आर्थिक, राजकीय व सांस्कृतिक परिस्थितीचे फळ असते. मराठ्यांच्या इतिहासातील अनेक कर्तृत्वान स्त्रीयांपैकी उमाबाई भोसले एक होय.

ऐतिहासिक दप्तरातून मराठा घराण्यातील स्त्रियांची कितीतरी पत्रे उपलब्ध आहेत. त्यावरुन मराठा घराण्यातील स्त्रींया चांगल्या शिकलेल्या आणि प्रशासनाची, युध्द कलेची आणि राजकारणाची जाण असलेल्या होत्या हे त्यांची प्रत्यक्ष पत्रे वाचल्यानंतर लक्षात येते. यावरुन मराठा घराण्यातील स्त्रीया जातीने राजकारणात, युध्दकारणात, प्रशासनात आणि धर्मकारणात भाग घेत असत. यात शंका नाही तसेच त्यांच्या पत्रव्यवहारावरुन बाह्य परिस्थिती बद्दल मराठा घराण्यातील स्त्रीया ह्या किती जागरुक रात याचे प्रत्यंतर उमाबाई भोसलेल्या कर्तबगारीने लक्षात येते.

मराठ्यांच्या इतिहासातील शहाजीची आई उमाबाई ही देखील एक कर्तबगार स्त्री होती. म्हणून भोसले घराण्यायतील कर्तबगार स्त्रियांची परंपरा उमाबाईपासून सुरु झाली, असे म्हणता येईल. मराठ्यांच्या इतिहासात उमाबाईची कर्तबगारी उपेक्षित राहिली आहे. प्रस्तुत शोध निंबधात उमाबाईंच्या कर्तबगारीचा आलेख रेखाटण्याचा प्रयत्न केलेला आहे.

उमाबाईचे माहेरचे नाव दीपाबाई फलटणचे नाईक निंबाळकर देशमुख यांची ती कन्या होती. दीपाबाईचा जन्म 1583 च्या सुमारास झाला असावा.[2] मालोजी आणि दीपाबाईच्या विवाहासंबंधीची माहिती चिटणीस बरवर, शेडगावकर बरवर, पंडितराव यांची बरवर, शिवभारत-इत्यादी संदर्भ ग्रंथात आलेली आहे.

" 'मालोजी राजास' निंबाळकर यांची कन्या दिली. तिचे नाव दीपाबाई असे ठेवले."[3] असा उल्लेख न्यायशास्त्री पंडितराव बरवरीमध्ये आलेला आहे.

शिवभारतामध्ये उमाबाईविषयी बराच मजकूर आलेला आहे. त्यावरुन उमाबाई हे सासरचे नाव होते याची खात्री पटते. शिवाय शिवभारतातील माहितीवरुन उमाबाई कर्तृत्ववान होती असेही दिसून येते.

राधामाधव विलास चंपू या ग्रंथातही मालोजीच्या पत्नीचे नाव उमाबाई होते असा स्पष्ट उल्लेख आलेला आहे. उमाबाईंनी धर्मकृत्ये केल्याची माहिती कागदपत्रांवरुही मिळते. 12 डिसेंबर 1644 च्या शहाजीच्या एका पत्रात श्री घृष्णेश्वर देवाच्या अभिषेकार्थ सालिना होन 17 मातुश्री उमाबाई आबासाहेबांनी विधीला होता. असा उल्लेख आलेला आहे.[4]

उमाबाईच्या पोटी शहाजीचा जन्म इ.स. सन 1600 किंवा 1601 च्या सुमारास झाला त्यानंतर केवळ पाच वर्षांनीच म्हणजे 1605 मालोजी इंदापूरच्या लढाईत मारला गेला. अर्थात त्याचवेळी शहाजीचे वय केवळ पाच वर्षाचे होते. शरफजी त्याच्यापेक्षा लहान होता. मालोजीच्या मृत्युच्या प्रसंग शिवभारतात आलेला असून विठोजीने म्हणजे मालोजीच्या भावाने उमाबाईला सती जाण्यापासून कसे परावृत केले, याची माहिती शिवभारत कारांनी दिलेली आहे.

स्वतःचे डोळे अश्रूंनी भरले असतानाही तो महान बुध्दीमय विठोजी पतिशोकाने विव्हळ झालेल्या आपल्या भावजायीचे सांत्वन करण्यासाठी गळा दाटून आलेल्या स्वरात म्हणाला, "हे थोर मनाच्या स्त्रिये हा मृत्युलोक असत्य आहे. हे लक्षात आणून तू शोक टाकून दे. तुझा पती आपल्या आप्ताला सोडून स्वर्गात गेला आहे. शत्रूच्या शस्त्रप्रहारांनी मरण यावे असेच शत्रूस पाठ न दाखवणारे शुर योध्दे इच्छितात. हे देवी शहाजी व शरफजी हे तुझे पाणीदार पुत्र उगवलेल्या तेजस्वी सूर्याप्रमाणे शोभत आहेत. वीरमातेच्या पोटी जन्मास आलेल्या या तुझ्या दोघा कुलदिपक पुत्रांचे आखील जगात उज्जवल यश पसरेल. हे दोघे कोवळे वयाचे असून त्यांचे जिवीत तुझ्यावरच अवलंबून आहे. म्हणून तू माझ्या विनंतीला मान देऊन तरी धीर धर व या दोघांच्या रक्षाणाकरिता तरी प्राण धारण कर."[5]

मालोजीच्या मृत्युनंतर जहागिरीचा सांभाळ करण्याची जबाबदारी शहाजी लहान असल्यामुळे विठोजीवर आली. 1610-1611 च्या सुमारास शहाजीने लग्न लखुजीराव जाधव यांची कन्या जिजाई हिच्याशी झाले. 1611-12 मध्ये शरफजीचे लग्न विश्वास राजाची मुलगी दुर्गा हिच्याशी झाले. याच विश्वासराज्याच्या वंशातील जयंती नावाच्या मुलीचे शहाजीचा मुलगा संभाजी याच्याबरोबर पुढे लग्न झाले. त्यामुळे शिवनेरी किल्ल्याच्या भोसले घराण्याशी संबंध आला.

शहाजीच्या जहागिरीचा सांभाळ विठोजी जरी करीत होता तरी उमाबाईंचा या कार्यात सहभाग होता. विठोजीच्या मृत्युनंतर 1613 नंतर शहाजीकडे पूर्णसूत्रे आली. त्यावेळी शहाजीचे वय 12 वर्षाचे होते. शहाजी अतिशय मातृभक्त होता. शिवभारतकारांनी म्हटले आहे, "नंतर



106

आपला चुलता विठोजी राजा हाही परलोकवासी झाला असा राजनीती जाणणाऱ्या आईच्या आज्ञेत वागणाऱ्या महापराक्रमी धैर्यवान व बुध्दीमान शहाजीराजाने तो रजाचा मोठा भार आपल्या शिरावर घेतला."[6]

विठोजीच्या मृत्युसमयी शहाजी केवळ 12 वर्षाचा होता. शिवभारतकारांनी जरी शहाजीने जहागिरीचा भार आपल्या शिरावर घेतला असे म्हटलेले असले तरी एवढ्या लहान वयात त्याला कोणाचे तरी मार्गदर्शन व प्रेरणा आवश्यक होती. अर्थात उमाबाईने जहागिरीचा सांभाळ करण्यास शहाजीला मार्गदर्शन केले असणे अत्यंत स्वाभाविक आहे. सासरी आलेल्या लहानग्या जिजाबाईला आपल्या सासूचे हे कर्तृत्व जवळून पाहावयास मिळाले. पुढे कालातंराने 1626 मध्ये शहाजीने आदिलशाहाची नोकरी पटकावली. कर्नाटकातील जहागिरीकडे जाताना पुणे जहागिरीचा 'पोट मोकासा' 6 वर्षाच्या लहानग्या शिवाजीच्या नावे करुन दिला. अर्थातच त्या पुणे जहागिरीचा सांभाळ करण्याची जबाबदारी पर्यायाने जिजाबाईवर आली.

शहाजीचा उत्कर्ष 1624 मध्ये भातवाडीच्या लढाईत झाला. तेंव्हापासून आपला स्वतंत्र बाणा दर्शविण्यास प्रारंभ केला. 1629 पर्यंत उमाबाई हयात होती असे कागदपत्रावरुन दिसून येते.[7]

**सारांश :**

वरील विवेचनावरुन उमाबाई हीने पतीच्या आणि दिराच्या निधनानंतर जहागिरीचा सांभाळ केल्याचे दिसून येते. उमाबाई ही एक मराठ्यांच्या इतिहासातील अग्रगण्य कर्तृत्ववान स्त्री होती ही गोष्ट सिध्द होती.

**संदर्भ सूची :**

1. गायकवाड, सरदेसाई, हानमाने, इतिहासलेखनशास्त्र, फडके प्रकाशन, कोल्हापूर, 2001, पृष्ठ 3.
2. चिटणीस बरवर, पृष्ठ 32.
3. न्यायशास्त्री पंडितराव बरवर, पृष्ठ 1.
4. रामदास आणि रामदासी, वर्ष 6, अंक-65,66, लेख-5.
5. शिवभारत अंक-1, पृष्ठ 13, 14.
6. शिवभारत, अंक-2 व अंक-3.
7. मालोजीराजे व शहाजी महाराज, पृष्ठ 422, 423.



107